**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १०२/२०१९</u>**

*CNR No. MHSO060017992019*

केराप्पा माने वगैरे

वि.

जिल्हाधिकारी, सोलापूर वगैरे

**<u>आदेश निशाणी क्र. ३६ आणि निशाणी क्र. १ वर</u>**

वादी क्र. १ केराप्पा दगडू माने हे दिनांक २३/०५/२०२२ रोजी मयत आहेत. त्यांना अनुक्रम नं. १(अ) ते १(इ) हे वारस आहेत. त्यामुळे मयत वादी क्र. १ केराप्पा दगडू माने यांचे नाव दावा निशाणी क्र. १ मधून कमी करुन त्या ऐवजी त्यांचे वारस अनुक्रम नं. १(अ) ते १(इ) यांची नावे रेकॉर्डवर घेण्यास आणि त्याप्रमाणे दावा निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे. त्यावर प्रतिवादी क्र. ३ ते ८ आणि ११ व १२ यांनी आक्षेप नोंदवला आहे.

०२. वादी क्र. १ केराप्पा दगडू माने हे दिनांक २३/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यानंतर मुदतीत दिनांक १०/०६/२०२२ रोजी प्रस्तुत अर्ज देण्यात आला आहे. हा दावा स्थावर मिळकत संबंधी आहे. वादी क्र. १ केराप्पा दगडू माने मयत झाल्यामुळे त्यांचे वारस यांचा दावा मिळकतमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झाला आहे. त्यामुळे उभय पक्षकार यांचे दरम्यान असलेल्या वादाचे गुणदोषावर कायमस्वरुपी आणि योग्य निराकरण होण्यासाठी मयत वादी क्र. १ केराप्पा दगडू माने यांचे नाव दावा निशाणी क्र. १ मधून कमी करुन त्या ऐवजी त्यांचे वारस अनुक्रम नं. १(अ) ते १(इ) यांची नावे समाविष्ट करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

२. मयत वादी क्र. १ केराप्पा दगडू माने यांचे नाव कमी करुन त्यांचे वारस अनुक्रम नं. १(अ) ते १(इ) यांचे नाव दावा निशाणी क्र. १ मध्ये समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. त्याप्रमाणे वादी यांनी दावा निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्ती करावी.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR

Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2023.03.17 17:25:17 +0530

दि. १७/०३/२०२३

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed<br>by the P.O. on | : | 17/03/2023 |
| Order uploaded on | : | 17/03/2023 |